VOL- IX ISSUE- X OCTOBER 2022 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.331 ISSN 2349-638x

# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या वास्तववादी साहित्यांचा चिकित्सक अभ्यास

**प्रा.डॉ.मनोहर तोटरे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
शाहीर अण्णाभाऊ साठे महाविद्यालय, मुखेड ता.मुखेड जि.नांदेड

तिसऱ्या इंग्रज मराठा युद्धात (1818) मराठे पराभूत झाल्याने मराठा साम्राज्याचा अस्त झाला व महाराष्ट्रात इंग्रजांच्या सत्तेचा पाया रचला गेला इंग्रज सत्तेमुळे भारतीयांना व महाराष्ट्रातील लोकांना पाश्चात्य संस्कृतीची व पाश्चात्य शिक्षणाची ओळख झाली.

एकोणिसावे शतक हे महाराष्ट्रातील प्रबोधन पर्वाची सुरुवात मानली जाते. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला महाराष्ट्राच्या समाजकारणात मोलाचे कार्य करणारे विवेकनिष्ठ समाजसुधारक उदयास आले व त्यांनी महाराष्ट्रातील समाजकारणाला गतिमान करण्याचे काम केले याच काळात महाराष्ट्रात वि.का.राजवाडे,वासुदेव शास्त्री यांनी इतिहास संशोधनात रस घेतला.

ब्रिटिश सत्ता स्थापनेमुळे प्रथमच भारतीय लोकांचा पाश्चात्य समाज व संस्कृतीशी संपर्क आला व ब्रिटिश सत्तेचे भारतीय समाज जीवनावर फार मोठे दुरगामी परिणाम घडून आले. पाश्चात्य संस्कृती, पाश्चात्यांचे उदारमतवाद, स्वातंत्र्य, समता व मानवतावादी विचारातून सुशिक्षित तरुणांची पिढी उदयास आली यातुन महाराष्ट्रात अनेक समाज व धर्मसुधारक उदयास आले त्यातूनच समाज व धर्म सुधारणा चळवळीचा उदय झाला.

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात ख्रिश्चन मिशनऱ्यांनी ग्रंथनिर्मिती करून लोकांत शिक्षणाविषयी आवड निर्माण केली. 1824 मध्ये अमेरिकन मिशनरी सोसायटीने मुंबई इलाख्यात पहिली मुलींची शाळा सुरु केली. 1829-30 या काळात विल्सन यांनी सहा शाळा काढल्या. 1834 मध्ये मुंबई ‘विल्सन कॉलेज’ हे मिशनरी कॉलेज स्थापन केले. विल्यम बेंटिगच्या काळात भारतीयांना शिक्षण देण्यासंबंधी दोन प्रवाह होते. विल्यम, सर विल्यम जोन्स, एच.टी. प्रिन्सेप यांचा भर पारंपारिक व पौर्वात्य ज्ञानाच्या प्रसारावर होता तसेच चार्ल्स ट्रॅव्हेलियन, बिशप हेबर, अलेक्झांडर डफ व रजा राममोहन रॉय यांचा भर पाश्चात्य व आधुनिक शिक्षणावर होता.पण शेवटी इंग्रजी/ पाश्चात्य शिक्षणालाच अग्रक्रम द्यावा, असा प्रस्ताव गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलने मंजूर केला. हा प्रस्ताव लॉर्ड मेकॉले यांनी मांडला होता.

मुंबई प्रांतात शिक्षणाचा प्रसार व महत्व वाढविण्याच्या कमी वृत्तपत्रांचीही भूमिका महत्वाची आहे. दर्पणकार बाळशास्त्री जांभेकरांनी दर्पणमधून, “विद्या हेच बळ” यासारख्या लेखांतून शिक्षणाचे महत्व मांडले. दर्पण, प्रभाकर, ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश, निबंधमाला या पत्रांनी शिक्षणाचे महत्व सांगून लोकांची शिक्षणा संदर्भात जागृती घडवून आणण्याचे काम केले.

समाज सुधारणेच्या इतिहासात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे मोलाचे योगदान आहे. स्वातंत्र्य आंदोलन, गोवामुक्ती आंदोलन, संयुक्त महाराष्ट्र चळवळ या सर्व आंदोलनात त्यांच्या कलापथकाने संपूर्ण महाराष्ट्रभर जनजागृती करण्याचे काम केले आहे. अण्णाभाऊ साठे हे ख्यातनाम मराठी साहित्यिक होते. वास्तव परिस्थितीचे दर्शन त्यांच्या साहित्यातून होते. 1

ऑगस्ट 1920 रोजी सांगली जिल्ह्यात वाटेगाव येथे अण्णाभाऊ साठे यांचा जन्म झाला.

**अण्णाभाऊ साठे यांची कौटुंबिक पार्श्वभूमी :-**

अण्णाभाऊ साठे यांचे पुर्णनाव तुकाराम भाऊराव साठे हे आहे. त्यांचे गाव पुर्वी कुरुंदवाड संस्थानात होते. आईचे नाव वाळूबाई होते. अण्णाभाऊ साठे यांचे दोन विवाह झाले होते. त्यांच्या दुसऱ्या पत्नीचे नाव जयवंताबाई होते व त्याही अण्णाप्रमाणेच समाजवादी कार्यकर्त्या होत्या अण्णांचे वडील कामावरती जात असल्याने दोघा लहान भावांना सांभाळण्याची जबाबदारी अण्णावर होती. वडिलांच्या आजारपणामुळे अण्णांनी वयाच्या 14 व्या वर्षी प्राथमिक शिक्षणाला सुरुवात केली. दांडपट्टा चालवणे, जंगलात भटकणे, पोहणे, मासेमारी, शिकार, पक्ष्यांशी मैत्री करणे, जंगलातील पानाफुलातील फरक शोधणे असे अनेक छंद होते. ----- जत्रेत त्यांनी क्रांतीसिंह नाना पाटील यांचे भाषण ऐकले त्यांचा परिणाम अण्णावरती झाला व त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेऊ लागले.

वयाच्या 11 व्या वर्षी अण्णाभाऊ वडिलांसोबत मुंबईस वास्तवास आले होते (दुष्काळामुळे) व मुंबईतील भायखळयाच्या 'चांदबीबी' चाळीत राहू लागले. (1932)

मुंबईत अण्णा तेथील राजकीय संघटन व चित्रपटांकडे आकर्षित झाले होते. मुंबईत आल्यानंतर मॉक्झिक गार्गीच्या साहित्याने ते प्रभावित झाले होते. कम्युनिस्ट पक्षाची कामे करीत असतानाच त्यांच्या तुकाराम या नावाचे अण्णा मध्ये रुपांतर झाले. मुंबईत पोटासाठी भटकत असताना त्यांनी घरगडी, बुटपॉलिश, डोअरकिपर, कुत्रा सांभाळणारा, खाण कामगार, ड्रेसिंगबॉय, कोळसा वाहक, हॉटेल बॉय इत्यादी कामे केली. याकाळातच त्यांना चित्रपटांचा छंद लागला व या छंदानेच ते साक्षर झाले. (चित्रपटांच्या पाट्या, रस्त्यावरील दुकानांच्या बोर्डावरील अक्षरे जुळवित ते साक्षर झाले.) वयाच्या 17-18 व्या वर्षीच अण्णांवर कुटुबांची जबाबदारी आली व त्यांनी गिरणीकामगार म्हणून कामाला सुरुवात केली. (कोहिनूर मिल मध्ये) नंतर मिल मधील नौकरी सुटल्याने त्यांच्या कुटुंबावर आर्थिक संकट येऊन ते कुटुंबासह परत आपल्या मुळगावी 'वाटेगाव' ला आले.इथे गावाकडे ते फार रमले नाहीत व ते त्यांच्या नातेवाईकाच्या तमाशा फडात सामील झाले.

**क्रांतिकारी लेखक, कवी :-**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्तिसंग्रामाच्या चळवळीत त्यांनी जनजागृती केली. वाटेगावात ते चलेजाव चळवळीत बर्डे गुरुजीसोबत असल्याने त्यांच्यावर पण अटकवॉरंट निघाले. त्यामुळे त्यांना घर सोडावे लागले. पुढे ते कम्युनिस्ट पक्षाचेह पूर्णवेळ काम करू लागले. या काळातच 1944 साली त्यांनी लालबावटा कलापथकाची स्थापना केली. (शाहीर अमर शेख, शाहीर गव्हाणकर यांच्या सहकार्याने) अण्णा मुंबईतील माटुंगा लेबर कॅम्प या दलित वस्तीत कम्युनिस्ट चळवळीत कार्य करू लागले. (आर.बी.मोरे, के.एम.साळवी, शंकर पगारे यासोबत) येथेच ते लिहायला शिकले व त्यांनी पहिले गाणे लेबर कॅम्प मधील मच्छरांवर लिहिले. याच कॅम्पमध्ये त्यांनी वरील कलापथकाची स्थापना केली. (लाल बावटा) 1945 च्या दरम्यान अण्णाचे आयुष्य मुंबईत स्थिरावले. लोकयुद्ध साप्ताहिकात वार्ताहराचे कार्य करती असताना त्यांनी अकलेची गोष्ट, माझी मुंबई, खायर्याचोर हि लोकनाट्य लिहिली.1950 ते 62 हा काल अण्णांचा साहित्य क्षेत्रातील सुवर्णकाळ होता. मुंबई सरकारने लालबावटा कलापथकावर बंदी घातली. त्या विरोधात अण्णांनी मोर्चा काढला. (घोषणा : ये आझादी झुटी है, देश की जनता भुकी है।) त्यांनी 300 पेक्षा जास्त कथा लिहिल्या.

**अण्णाभाऊ साठे यांनी लिहिलेल्या कथा :**

उपकाराची फेड, कोंबडी चोर, चिरागनगरची भूत, जिवंत काडतूस, बंडवाला, बरबाजा कंजारी, मरी आईचा गाडा, रामोशी, वळणसापळा आदी.

भारतीय समाजातील जातीतील उतरंडीमुळे चांभार, मांग यातही कनिष्ठ श्रेष्ठ भावना वाढते याचे चित्रण त्यात येते. गरिबीमुळे माणूस चोरीस कसा मजबूर होतो याचे चित्रण. तुरुंगात भेटलेल्या कैद्याचे चित्रण, मुंबईतील चिरागनगरीत राहत असतानाचे जीवन संघर्ष चित्रण, 1942 लढ्यातील सहकाऱ्यांचे चित्रण, जमीनदाराच्या अन्यायाविरुद्ध लढणारा मांग तरुणाची कथा, जातपंचायतीच्या अमानुष प्रथा, अंधश्रद्धा, यदु रामोशीचा जमीनदारा विरुद्ध संघर्ष आंबेडकरांची दलित चळवळ इत्यादी बाबीवर वास्तव प्रकाश टाकण्यात आला आहे.

**अण्णांच्या कादंबरीवर आधारित चित्रपट :**

वैजयंता, आवडी, माकडीचा माळ, चिखलातील कमळ, वारणेचा वाघ, अलगुज, फकिरा, चित्रा इत्यादी.

1961 साली रेखा फिल्मस वर वैजयंता चित्रपट, 1960 मध्ये चित्रज्योत कंपनी “टिळा लावते मी रक्ताचा”, 1969 विलास चित्रकंपनी “डोंगरची मैना” 1969 रसिक चित्रकंपनी मुरली मल्हारी रायाची, 1970 नवदीप चित्रकंपनी वारणेचा वाघ, 1974 श्रीपाद चित्रकंपनी “अशी हि साताऱ्याची तऱ्हा” चित्रनिकेतन कंपनी “फकिरा” 2012 साली चित्रा (चित्रा हि अण्णांची पहिली कादंबरी)

**अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्या :**

अग्निदिव्य, आवडी, चिखलातील कमळ, सैरसोबत, तास, रावा, खोऱ्यात, अलगुज, केवड्याचे कणीस, चित्रा, पाझर, मथुरा, रानगंगा, वैर, अहंकार, कुरूप, जिवंत, फकीरा, मंगला, रानबोळ, संघर्ष, आग, गुलाम, काडतूस, धुंद रानफुलाचा, मास्तर, रूप, डोळे मारित राधा चाले, आघात, चंदन, ढासलेल्या बंदुका, फुलपाखरू, मूर्ती, वारणेचा वाघ, वैजंयता आदी.

**अण्णाभाऊ साठे यांचे कथा संग्रह :**

आबी, खूळवाडी, गुऱ्हाळ, नवती, पिसाळलेला माणूस, भानामती, कृष्णाकाठच्या कथा, गजाआड, चिरागनगरची भूत, निखारा, बरबाद्या केंजारी, लाडी इत्यादी.

**अण्णाभाऊ साठे यांचे तमाशा :**

अकलेची गोष्ट, पेंद्याच लगीन, (नाटक) दुष्काळात तेरावा, लोकमैत्र्याचा दौरा, पुढारी मिळाला, माझी मुंबई, मूक मिरवणूक (नाटक) शेटजींच इलेक्शन, बेकायदेशीर, खापऱ्या चोर, देशभक्त घोटाळे, कलंजी, बिलंदर बुडाचे (नाटक) निवडणुकीतील घोटाळे इत्यादी.

**अण्णाभाऊ साठे यांचे पोवाडे :**

अंमळनेरचे अमर हुतात्मे, बंगालची हक, मुंबईचा कामगार, तेलंगनचा संग्राम, बर्लिनचा पोवाडा, स्टॅलीन ग्राड्या पोवाडा, (पार्टी मासिकात) नानकीन नगरापुढे, काळ्या बाजाराचा पोवाडा, शाहिरी-शाहिरी, पंजाब दिल्लीचा दंगा, महाराष्ट्राची परंपरा इत्यादी.

**ग्रामीण जीवनाचे चित्रण :**

वारणेचा वाघ, वाटणेच्या खोऱ्यात, कुरूप, अलगुज, वैर, मयुर, आवडी, पाझर, रानगंगा, केवड्याच कणीस, मंगला, संस्कार, रूपा, माकडीचा माल, डोळे मोडीत राधा चाले.

वैर : येळगाव खोऱ्यातील गरीब व श्रीमंत शेतकऱ्यांचा संघर्ष मांडला.

माकडीचा माळ : सुगीच्या दिवसात गावाबाहेर राहणाऱ्या फिरत्या जमातीच्या तांड्याचे वर्णन

आग : मुंबईतील झोपडपट्टीचे जीवन पैलू मांडले.

रानबोका : रानबोक्याला गुरु मानणाऱ्या गण्या नाटला या दरोडेखोराची कहानी

आवडी : ग्रामीण सधन कुटुंबातील सुंदर तरुणीच्या स्वप्नीचा पुरुषप्रधान वृत्तीमुळे कसा चुराडा होतो याचे वर्णन

वारणेच्या खोऱ्यात : 1940 च्या लढ्यात सातारी मुलीने प्रियकराला दिलेल्या साथीचे वर्णन

वारणेचा वाघ : ब्रिटीशांच्या दडपशाही विरोधी बंड पुकारणाऱ्या एक क्रांतीकाऱ्यांची कथा.

**दलित जीवनाचे चित्रण :**

फकिरा, गुलाम, चंदन, वैजयंता, आघात, रत्ना, माकडीचा माल, रानबोका, रत्ना, चिखलातील कमळ.

फकिरा : ब्रिटीश सत्तेला आव्हान देणाऱ्या तरुणाची कथा.

**संघर्ष : प्रेमकथा**

राजगंगा : वैरागच्या शिखरावर फुललेली प्रेम कथा.

**कथा :**

सुलतान : मार्क्सवादी कथा

गजासाड : पोटासाठी गुन्हा करणाऱ्या व दारिद्यामुळे गुन्हेगारीकडे वळलेल्या गुन्हेगारांच्या कथा (सेन्ट्रल जेष्ठ मधील कैद्यांच्या कथा)

शेहखान : बाबूखान या मूर्ख माणसाच्या ऐकण्यावरून अडचणीत पडलेल्या चार पठणाची कथा.

मकुल मुलानी : बेकारीच्या दुष्टचक्रात अडकलेल्या कुटुंबाची कथा.

उपकाराची फेड : उच्चनीचतेच्या पथेवर आघात

निखारा : गरीब पण सुंदर मुलीच्या लढाऊ जीवनाचे वर्णन

चिरागनगरीतील भूत : या कथेतील प्रत्येक भूत एक वेगळा नमुना आहेत.

गुऱ्हाळ : यात जिव्हाळा नावाची कौटुबिंक कथा

पिला : कोळीनिची प्रेमकथा

तमाशा : बापू या तमासगिराच्या जीवनावर आधारित

निळू मांग : गावगुंडाच्या त्रासाला बळी पडलेल्या व्यक्तीची कथा

राम – रावण युद्ध : ग्रामीण भागातील संघर्षाचे वर्णन करणारी विनोदी कथा

**कादंबरी**

अग्निदिव्य : प्रतापराव गुजर यांच्या जीवनावरील नायकप्रधान कादंबरी

मास्तर : देशभक्त क्रांतिवीर शिक्षकाची कथा

पोवाडे – लावणी – लोकनाट्य

स्टॅलीनग्राडचा पोवाडा : या सातचौकी पोवाड्यामुळे अण्णा कम्युनिस्टांमध्ये झाले.

बर्लिनचा पोवाडा : आंतरराष्ट्रीय महायुद्धावर आधारित

नाजकिंग नगरापुढे : हा त्यांचा पहिला पोवाडा (1942)

बंगालची हाक : बंगालमधील काळाबाजार व दुष्काळावर आधारित

अकलेची गोष्ट : तीन शेतकऱ्याच्या वाद्युक्त सवाल जवाबातून मार्क्सवादी दृष्टीकोन मांडला (7000 प्रयोग)

लोकमंत्र्याचा दौरा : 1952 च्या पहिल्या मंत्रिमंडळातील दोष दाखवियासाठी

शेठजिचे इलेक्शन : पक्षांच्या जाहीरनाम्याची चिकित्सा करणारी व समाजवादी कार्यक्रमाची पकड खोलवर रुजवणारी लावणी

माझी मुंबई : मुंबई महाराष्ट्राचीच आहे हे सांगण्यासाठी

**स्त्री जीवनावर आधारित**

चित्रा, रत्ना, वैजयंता, आवडी, चंदन फुलपाखरू, चिखलातील कमळ, टीळा लावते मी रक्ताचा

टीळा लावते मी रक्ताचा : ग्रामीण सधन परिवारातील सुंदर तरुणीच्या स्वप्नांचा पुरुष प्रधान वृत्तीमुळे कसा चुराडा होतो.

चित्रा : सत्यकथेवार आधारित आहे.

रत्ना : तरुण सैनिकाच्या पत्नीची व्यथा

वैजयंता : कलाकारांचे जीवन वर्णन

चंदन : लढाऊ कामगार स्त्री चे जीवन वर्णन

चिखलातील कमळ : मुरळी प्रथेतील व्यथा मांडणारी कादंबरी

आवडी : ग्रामीण सधन परिवारातील सुंदर तरुणीच्या स्वप्नांचा पुरुष प्रधान वृत्तीमुळे कसा चुराडा होतो याचे वर्णन

**प्रेम शृंगार कथा**

अलगुज, गुलाम, संघर्ष, रानगंगा, अहंकार मूर्ती, मयुरा

अलगुज : सधन शेतकरी गनू मोहितेची मुलगी रंगी व त्यांचा घरगडी बापू खारवते यांची प्रेमकथा

अहंकार : अहंकारामुळे स्त्री च्या जीवनात कशा अडचणीत येतात याचे दर्शन

**इतर :**

वारणेच्या खोऱ्यात – स्वातंत्र्यासाठी हौतत्म्य पत्कारणाऱ्या तरुण व त्याच्या प्रियसीची कथा

वैजयंता – पृथ्वी शेष नागावर बसून कष्टकरी व दिन दलितांच्या हातावर तरलेली आहे.

माझ्या रशियाचा प्रवास – हे प्रवासवर्णन

1961 साली फकिरा कादंबरीला महाराष्ट्र सरकारचा सर्वोत्कृष्ट कादंबरी पुरस्कार

(त्यात त्यांनी भीषण दुष्काळातील ब्रिटीशांचे खनिजे धन्य लुटून ते गरीब – दलीतात वाटणाऱ्या फकिरा या मांग समाजातील लढाऊ तरुणाचे चित्रण त्यात केले आहे)

अण्णांच्या शाहीर या पुस्तकाला ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते एस.ए. डांगे यांनी प्रस्तावना लिहून अण्णांचा गौरव केला.

अण्णांच्या इनामदार या नाटकास हिंदी प्रयोगासाठी कम्यु.पक्षाशी संबंधित इंडियन पीपल्स थियेटर असोशियन (इप्टा) च्या बलराज सहानी यांनी पुढाकार घेतला.

(त्या नाटकात ए.के. हंगल होते) (पुढे अण्णाभाऊ इप्टा चे अध्यक्ष हि झाले)

त्यातून त्यांनी त्यासाठी तमाशा या महाराष्ट्रातील लोककलेचा आकृतिबंध स्वीकारला.

तमाशाच्या पारंपारिक सादरीकरणातील गण – गवळण आणि वग यापैकी गण – बताकणी-वगनाट्य भाऊंनी स्वीकारले

वगनाट्य – दुष्काळात तेरावा, देशभक्त घोटाळे, पुढारी मिळाला, पेंद्याच लगीन (नाटक), अकलेची गोष्ट, शेटजीच इलेक्शन, बेकायदेशीर, माझी मुंबई/मुंबई कोणाची ?, मूक मिरवणूक, लोकमंत्र्याचा दौरा, खापली चोर, बिलंदर बडवे

काव्ये – अंमळनेरचे हुतात्मे, पंजाब दिल्लीचा दंगा

गरुडाला पंख, वाघला नखं तशी (मुंबई) मराठी मुलखाला हे कवन सयुंक्त महाराष्ट्राच्या चळवळीत गाजले.

अण्णांनी लिहिलेल्या प्रसिद्ध छक्कड लावणीचा प्रकार माझी मैना गावाकड राहिली हि काव्यरचना अविस्मरणीय आहे.

1948 पॅरिस मधील जागतिक साहित्य परिषदेसाठी अण्णांना निमंत्रण पण पैशा अभावी जाता आले नाही

पहिल्या दलित साहित्य संमेलनाचे (1958 साली) उद्घाटक – अण्णाभाऊ साठे

अण्णाभाऊ साठेनी – 35 कादंबऱ्या, 13 कथा संग्रह, 8 पटकथाम, 1 प्रवासवर्णन, ३ नाटके, 10 पोवाडे व 14 लोकनाट्य, 12 उपहासात्मक लेख यांचे लिखाण केले.

चीनी जणांची मुक्तीसेवा हे चीनी क्रांतीवरील व जग बदल घालूनी घाव – सांगुनी गेले भीमराव हि आंबेडकरांवरील गाणे गाजली. मराठीतील ग्रामीण – प्रादेशिक दलित साहित्यावर अण्णाभाऊ चे प्रभुत्व होते. अण्णांची चित्रा कादंबरी रशियन भाषेत प्रकाशित. अण्णाचे साहित्य – जगातील 27 भाषात भाषातरीत झाले आहे. (रशियन, झेक, पोर्तुगीज, फ्रेंच इ.), 1961 इंडो सोव्हिएत कल्चर सोसायटी निमंत्रणावरून अण्णा रशियाला पोचले. रशियातील कलावंत ॲंगले हे अण्णाभाऊ चे मित्र होते.

**मृत्यू**

18 जुलै 1969 रोजी झाला. त्यांच्या मृत्यूनंतर 1 ऑगस्ट 2002 साली त्यांचे टपाल तिकीट प्रकाशन केले गेले. प्रमोद महाजनांनी महाराष्ट्राचे संत असा त्यांचा गौरव केला. पु.ल. देशपांडे यांनी त्यांचे तीन पैशाचा तमाशा नाटक अण्णांना समर्पित केले.

VOL- IX ISSUE- X OCTOBER 2022 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.331 ISSN 2349-638x

**संदर्भ :**

1. विपुल पाटील – महाराष्ट्रातील समाज सुधारक
2. प्रा.अजित पाटील – भारतातील आणि महाराष्ट्रातील समाजसुधारक
3. विजय आपटे – शोध महाराष्ट्राचा
4. डॉ.श्रीनिवास सातभाई – आधुनिक भारताचा इतिहास
5. रंजन कोलंबी – आधुनिक भारताचा इतिहास
6. कुमार केतकर – कथा स्वातंत्र्याची
7. उमेश कुदळे - महाराष्ट्रातील समाज सुधारक व व्यक्ती विशेष